दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. ३० मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १८४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

सोमवार दि. ३० मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष, द्वादशी सकाळी ७-१० पर्यंत, दिवस नक्षत्र– मघा दुपारी २-४८ पर्यंत, चंद्र रास- सिंह, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

### औषधेही महागणार..!

**नवी दिल्ली:** इराण-अमेरिका युद्धामुळे केवळ पेट्रोल-डिझेलच नाही, तर आता तुमच्या स्वयंपाकघरातील प्लास्टिकचे डबे, बादल्या आणि अगदी औषधांच्या किमतीही कडाडणार आहेत. युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे कच्च्या मालाच्या (पॉलिमर) किमतीत मोठी वाढ झाली आहे. भारतातील अनेक कंपन्यांनी प्लास्टिकच्या कच्च्या मालाच्या दरात मोठी वाढ केल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडणार आहे.

## सारांश वृत्त

### मथुरामध्ये एलपीजी सिलेंडरचा स्फोट

**मथुरा (उत्तर प्रदेश) :** येथील छाटा भागातील भोगाव गावात रविवारी पहाटे घरात झालेल्या गॅस सिलेंडरच्या स्फोटातून एक महिला थोडक्यात बचावली. स्फोटामुळे इमारतीचे नुकसान झाले, मात्र कोणतीही जीवितहानी झाली नाही. मनोजने सांगितले की, त्याची मेहुणी रामवती (३५) पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास स्टोव्हवर चहा ठेवून जनावरांना चारा देण्यासाठी बाहेर गेली होती, तेव्हा सिलेंडरचा मोठ्या आवाजासह स्फोट झाला.

### 'आप' आमदाराच्या पोलीस कोठडीत वाढ

**पटियाला :** बलात्काराच्या एका प्रकरणात सहा महिन्यांहून अधिक काळानंतर पोलीस कोठडीतून फरार झालेले 'आप'चे आमदार हरमीत सिंग पठाणमाजरा यांना मंगळवारी रात्री पंजाब पोलिसांनी मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथून अटक केली होती. येथील एका न्यायालयाने रविवारी त्यांच्या पोलीस कोठडीत सात दिवसांची वाढ केली. सानौर मतदारसंघाच्या आमदाराला त्यांची चार दिवसांची पोलीस कोठडी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

### रस्ते अपघातात तिघांचा मृत्यू

**रांची :** झारखंडच्या रांची आणि साहिबगंज जिल्ह्यांमध्ये रविवारी झालेल्या वेगवेगळ्या रस्ते अपघातांमध्ये चार वर्षांच्या मुलासह तीन जणांचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. येथून सुमारे ४८ किमी अंतरावर असलेल्या अंगारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रांची-पुरुलिया रस्त्यावरील चामघाटी येथे एका ट्रकने मोटारसायकलला धडक दिल्याने दोन भावांचा मृत्यू झाला, अशी माहिती एका पोलीस अधिकाऱ्याने दिली.

### राष्ट्रवादीत अंतर्गत वाद पेटला; अमोल मिटकरींचा स्वकीयांवर थेट निशाणा

# दैवतांना डावलून स्वत: देव बनू नका!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा उफाळून आले असल्याचे चित्र दिसत असून, पक्षाचे आक्रमक आमदार आणि प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी केलेल्या सोशल मीडिया पोस्टमुळे मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. पक्षातील ज्येष्ठ नेतृत्वाला डावलले जात असल्याचा सूचक आरोप करत त्यांनी स्वकीयांवरच अप्रत्यक्षपणे निशाणा साधला आहे.

अमोल मिटकरी यांनी त्यांच्या अधिकृत 'एक्स' (ट्विटर) हँडलवरून व्यक्त केलेली नाराजी सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. "ज्यांच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांचा विश्वास आहे, त्यांचाच फोटो हटवला जातोय, हे राष्ट्रवादीचा सर्वसामान्य कार्यकर्ता कधीही सहन करणार नाही," असे स्पष्टपणे नमूद करत त्यांनी पक्षातील घडामोडींवर नाराजी व्यक्त केली आहे.

या पोस्टमध्ये त्यांनी काही महत्त्वाच्या नेत्यांचे फोटो वापरत, "राष्ट्रवादीच्या दैवतांना डावलून स्वतः देव बनण्याचा कुणी प्रयत्न करू नये. महाराष्ट्र हे सहन करणार नाही," असा इशाराही दिला आहे. त्यामुळे त्यांच्या या वक्तव्याचा रोख नेमका कोणाकडे आहे, याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

पक्षातील अंतर्गत राजकारण आणि नेतृत्वाच्या प्रतिमेबाबत सुरू असलेल्या चर्चांना या पोस्टने अधिक हवा दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अलीकडच्या काळात नेतृत्व, संघटनात्मक बदल आणि प्रचारातील प्राधान्यक्रम यावरून मतभेद असल्याच्या चर्चा आधीपासूनच सुरू होत्या. अशा परिस्थितीत मिटकरींच्या वक्तव्यामुळे या वादाला उघडपणे वाचा फुटल्याचे मानले जात आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, पक्षाच्या स्थापनेपासून संघटना उभी करणाऱ्या ज्येष्ठ नेत्यांना बाजूला ठेवून नव्या नेतृत्वाने स्वतःची प्रतिमा पुढे आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याची कुजबुज कार्यकर्त्यांमध्ये आहे. याच पार्श्वभूमीवर मिटकरींची पोस्ट ही केवळ वैयक्तिक प्रतिक्रिया नसून, कार्यकर्त्यांच्या भावना व्यक्त करणारी असल्याचेही काहींचे मत आहे.

### पोस्टरवरून राजकीय वाद

● रायगडमध्ये नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या उमेदवारांच्या सत्कार समारंभात अनपेक्षित वाद उफाळून आला. या कार्यक्रमाला खासदार सुनील तटकरे आणि मंत्री आदिती तटकरे उपस्थित होत्या. मात्र, स्टेजवरील पोस्टरवर फक्त तटकरे कुटुंबीयांचे फोटो झळकल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ दिवंगत नेते अजित पवार तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे फोटो पोस्टरवर नसल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली.

# युद्धकाळात एकजूट राखण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियातील सुरू असलेल्या युद्धामुळे परिस्थिती आव्हानात्मक असल्याचे सांगत या संकटाचे राजकारण करू नये, असा इशारा दिला. 'मन की बात' या रेडिओ कार्यक्रमात त्यांनी देशवासीयांना एकजूट राहण्याचे आवाहन केले.

मोदी म्हणाले की, भारताच्या शेजारील प्रदेशात गेल्या महिन्याभरापासून भीषण युद्ध सुरू असून ही परिस्थिती अत्यंत आव्हानात्मक आहे. अशा वेळी देशातील सर्वांनी एकत्र येऊन या संकटाचा सामना करणे आवश्यक आहे. या विषयावर स्वार्थी राजकारणाला स्थान नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच अफवा पसरवणाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले. पश्चिम आशियातील संघर्षामुळे जगभरात इंधन संकट निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही मोदी यांनी सांगितले. भारताच्या ऊर्जा गरजांसाठी पश्चिम आशिया अत्यंत महत्त्वाचा प्रदेश असल्याने या युद्धाचा परिणाम भारतावरही होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले.

आखाती देशांमध्ये काम करणाऱ्या एक कोटीहून अधिक भारतीयांना तेथील सरकारे मदत करत आहेत आणि त्याबद्दल त्यांनी त्या देशांचे आभार मानले. मोदी यांनी यापूर्वीही पश्चिम आशियातील युद्धाचा भारतावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो, त्यामुळे देशाने तयार राहण्याची गरज असल्याचे म्हटले होते.

# खाकी वर्दीचे स्वप्न अधुरेच...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** खाकी वर्दीचे स्वप्न उराशी बाळगून पोलीस भरतीसाठी मैदानात उतरलेल्या एका युवकाचा धावताना मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना पुण्यात घडली. पोलीस भरतीच्या मैदानी चाचणीदरम्यान ही दुर्दैवी घटना घडली.

मृत युवकाचे नाव पुरुषोत्तम भीमराव बुरुकुल असे असून तो देऊळगाव राजा तालुक्यातील चिंचोली बोरे येथील रहिवासी होता. दोन बहिणींचा लाडका भाऊ आणि आई-वडिलांचा एकुलता एक आधार हरपल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पुणे येथे सुरू असलेल्या पोलीस भरतीत १६०० मीटर धावण्याच्या चाचणीदरम्यान पुरुषोत्तम धावत असताना अचानक कोसळला. त्याने दोन फेऱ्या पूर्ण केल्या होत्या, मात्र तिसऱ्या फेरीत धावत असताना त्याला चक्कर आली आणि तो खाली पडला. उपस्थितांनी तातडीने त्याला ससून रुग्णालय येथे दाखल केले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

डॉक्टरांच्या प्राथमिक माहितीनुसार त्याला फिटसारखा झटका आला असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पुरुषोत्तमच्या वडिलांची तब्येत गेल्या काही वर्षांपासून खराब असून ते अंथरुणाला खिळले आहेत. त्यामुळे कुटुंबाची जबाबदारी पुरुषोत्तमवरच होती. पोलीस बनून कुटुंबाला आधार द्यायचा, घर उभे करायचे हे त्याचे स्वप्न होते. त्याच्या मृत्यूची बातमी समजताच कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

### सुपरफास्ट पद्धतीचा अवलंब; नवी कार्यपद्धती लागू

# राज्यातील जमीन मोजणी प्रक्रियेला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील जमीन मोजणी प्रक्रियेला वेग देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून आता जमीन मोजणी 'सुपरफास्ट' पद्धतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने ही नवी कार्यपद्धती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून हा निर्णय घेण्यात आला असून त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. राज्यभरात जमीन मोजणीसाठी प्रलंबित असलेल्या हजारो अर्जांचा विचार करून प्रक्रिया जलद आणि पारदर्शक करण्यावर भर देण्यात आला आहे.

नव्या धोरणानुसार, प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षित खाजगी भूमापकांची नियुक्ती केली जाणार आहे. या भूमापकांच्या मदतीने मोजणीची कामे ठरलेल्या दिवशीच पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे सरकारी यंत्रणेवरील ताण कमी होऊन मोजणी प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

सध्या जमीन मोजणीसाठी अनेक नागरिकांना महिनोनमहिने प्रतीक्षा करावी लागत होती. जमीन वाद, शेती मोजणी, बांधकाम परवानग्या आणि मालमत्ता व्यवहार यासाठी मोजणी आवश्यक असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. मात्र आता ठराविक कालमर्यादेत मोजणी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

दरम्यान, खाजगी भूमापकांच्या नियुक्तीसाठी आवश्यक प्रशिक्षण, पात्रता निकष आणि नियमावली निश्चित करण्यात येणार आहे. सरकारच्या या निर्णयामुळे जमीन मोजणीची प्रक्रिया अधिक गतिमान होणार असून प्रलंबित प्रकरणे लवकर मार्गी लागतील, तसेच शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सध्या जमीन मोजणीसाठी अनेक नागरिकांना महिनोनमहिने प्रतीक्षा करावी लागत होती. मात्र आता ठराविक वेळेत मोजणी पूर्ण होणार असल्याने या अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. या निर्णयाने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

### केंद्र सरकारची उच्च न्यायालयात माहिती

# लएलपीजी तुटवड्यावर सर्वतोपरी प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नागपूर :** पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या एलपीजी तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याचे केंद्र सरकारने मुंबई उच्च न्यायालयाला सांगितले. न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने केंद्राचे म्हणणे नोंदवून एलपीजी वितरकांची याचिका निकाली काढली.

इराणमधील युद्धामुळे ऊर्जा संकट निर्माण झाले असून घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा वाढवण्याची मागणी करत सहा एलपीजी वितरकांनी याचिका दाखल केली होती. त्यानंतर न्यायालयाने केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि कॉन्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लिमिटेड यांना नोटीस बजावली होती.

केंद्र सरकारचे अवर सचिव रमेश कृष्णा यांनी न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून एलपीजीचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकार सर्व पावले उचलत असल्याचे सांगितले. आंतरराष्ट्रीय परिस्थिती सतत बदलत असून त्यावर सरकार लक्ष ठेवून आहे, तसेच देशांतर्गत ग्राहकांना प्राधान्य देण्याचे धोरण कायम असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले.

सुनावणीदरम्यान भारताचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, एलपीजी तुटवड्यामुळे नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर राजनैतिक चर्चाही सुरू आहेत. निर्यातीपेक्षा देशांतर्गत पुरवठ्याला प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

केंद्राच्या प्रतिज्ञापत्रातील निवेदनावरून सरकार नागरिकांच्या हितासाठी आवश्यक पावले उचलत असल्याचे स्पष्ट होत असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने याचिका निकाली काढली. तसेच, स्थानिक पातळीवर कोणत्याही वितरकाच्या निष्काळजीपणामुळे समस्या निर्माण झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडून कठोर कारवाई केली जाईल, असेही केंद्राने न्यायालयाला सांगितले.

### पंतप्रधान मोदींच्या रोडशोला प्रचंड गर्दी

**थ्रिसूर (केरळ) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी एनडीएच्या विधानसभा निवडणूक प्रचाराचा भाग म्हणून थ्रिसूरमध्ये एक उत्साही रोडशो आयोजित केला, ज्यामध्ये हजारो लोक सहभागी झाले आणि या कार्यक्रमाला एका चैतन्यमय सांस्कृतिक सोहळ्याचे स्वरूप आले. स्वराज्य राऊंडवरील जिल्हा रुग्णालयाजवळून सुरू झालेला हा रोडशो शहराच्या मध्यभागातून सुमारे ९०० मीटरचा प्रवास करत येथील बिनी हेरिटेज हॉटेलजवळ समाप्त झाला. भव्य रोडशोमुळे केरळची सांस्कृतिक राजधानी अक्षरशः पक्षाचे झेंडे, जल्लोष करणारे समर्थक आणि उत्सुक प्रेक्षकांच्या सागरात बदलून गेली.

# विनाखटला तुरुंगवास ही शिक्षाच

### सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** खटला सुरू न होता आरोपीला दीर्घकाळ तुरुंगात ठेवणे हे शिक्षेसारखेच आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने एका आरोपीला जामीन मंजूर केला आहे.

पंजाबमधील हत्येचा प्रयत्न प्रकरणात गेल्या दोन वर्षांपासून कारागृहात असलेल्या प्रदीपककुमार उर्फ बानू याला न्यायालयाने हा दिलासा दिला. न्या. दिपांकर दत्ता आणि न्या. पी. व्ही. वराळे यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना न्यायव्यवस्थेतील विलंब आणि आरोपींच्या मानवी हक्कांवर महत्त्वपूर्ण भाष्य केले.

प्रदीपककुमार याला फेब्रुवारी २०२४ मध्ये अटक करण्यात आली होती. या प्रकरणात सरकारी पक्षाला एकूण २३ साक्षीदारांची उलटतपासणी करायची आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांत एकाही साक्षीदाराची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. खटला अद्याप सुरू झालेला नाही आणि तो लवकर संपण्याची शक्यता दिसत नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. यापूर्वी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने ११ जुलै २०२५ रोजी प्रदीपककुमारचा जामीन अर्ज फेटाळला होता. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करून आरोपीला जामीन मंजूर केला.

तपास आणि खटला पूर्ण होण्यास विलंब होत असल्यास केवळ संशयाच्या आधारावर कोणालाही अनिश्चित काळासाठी तुरुंगात ठेवता येणार नाही. विनाखटला दीर्घकाळ तुरुंगवास ही एक प्रकारची शिक्षा ठरते, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले.

### पारंपरिक वेळेत बदल करत यावर्षी पालखी दुपारी ३ वाजता मार्गस्थ होणार

# माऊलींच्या पालखी सोहळ्याचे ८ जुलै रोजी प्रस्थान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी येथील संस्थानची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली असून यंदाच्या वारीसाठी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे सविस्तर नियोजन निश्चित करण्यात आले आहे. राज्यभरातील लाखो वारकऱ्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या या सोहळ्याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. यंदा ८ जुलै रोजी आळंदी येथून पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. पारंपरिक वेळेत बदल करत यावर्षी पालखी दुपारी ३ वाजता मार्गस्थ होणार आहे. यामुळे दिंडींना नियोजित वेळेत आपापल्या जागी पोहोचणे सुलभ होणार असल्याचे संस्थानकडून सांगण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे पालखीचा पुण्यात दोन दिवस मुक्काम असतो. मात्र, यंदा या मुक्कामाच्या ठिकाणात बदल होण्याची शक्यता आहे. दिंडी समाजाच्या बैठकीत याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. गेल्या वर्षी पालखी भवानी पेठ येथे पोहोचल्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. परिणामी अनेक दिंड्यांना पालखीपर्यंत पोहोचता आले नाही, तसेच व्यवस्थापनावर ताण निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर भवानी पेठेऐवजी वडकी नाका येथे मुक्काम ठेवण्याची मागणी पुढे आली आहे. तसेच पुण्यात एक दिवस मुक्काम करून दुसरा मुक्काम वडकी नाका येथे ठेवण्याचा प्रस्तावही चर्चेत आहे. याबाबत अंतिम निर्णय लवकरच घेतला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. गेल्या वर्षी पालखीला पुण्याहून सासवडपर्यंत पोहोचायला उशीर झाला होता. विशेषतः हडपसर ते दिवेघाट या मार्गावरील रस्त्याच्या कामामुळे दिंड्यांना मोठा त्रास सहन करावा लागला. या समस्येवर उपाय म्हणून यंदा मार्ग आणि मुक्कामाचे नियोजन अधिक सुटसुटीत करण्यावर भर देण्यात आला आहे. यंदाच्या वारीत वारकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी पाणी, आरोग्य सुविधा, वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षा यावर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. प्रशासन, पोलिस यंत्रणा आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या समन्वयातून संपूर्ण व्यवस्थापन उभारले जाणार आहे.

आषाढी वारी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा कणा मानला जातो. लाखो वारकरी 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात पंढरपूरकडे प्रस्थान करतात. यंदा पालखीच्या वेळापत्रकात आणि मुक्कामात होणारे बदल लक्षात घेता, वारी अधिक सुरळीत आणि शिस्तबद्ध पार पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बीडच्या सुपुत्राचा महाराष्ट्रात डंका



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** मूळचे बीड येथील सुपुत्र तथा नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाचे महाराष्ट्राचे संचालक जितेंद्र लक्ष्मणराव भोपळे यांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून जनतेसाठी अमूलाग्र बदल करणाऱ्या विविध कार्यालय प्रमुखांच्या कामाचा सन्मान करण्यात आला. बीडचे सुपुत्र असलेले स्वातंत्र्यसैनिक स्वर्गीय ॲड. लक्ष्मणराव भोपळे यांचे चिरंजीव आणि नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाचे संचालक जितेंद्र भोपळे यांना सन्मानित करण्यात आले. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून प्रशासन अधिक पारदर्शक, जलद आणि लोकाभिमुख करण्यासाठी त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला. याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## संपादकीय

# औद्योगिक रचना, धोरण आणि विकास



**भारताच्या आर्थिक प्रगतीबद्दल बोलताना सेवा क्षेत्र, डिजिटल अर्थव्यवस्था, स्टार्टअप्स यांची चर्चा मोठ्या प्रमाणावर होते. परंतु इतिहास सांगतो की कोणताही मोठा देश केवळ सेवा क्षेत्रावर महासत्ता बनलेला नाही. औद्योगिक धोरण, उत्पादन क्षमता आणि तंत्रज्ञान उद्योग यावरच दीर्घकालीन आर्थिक शक्ती उभी राहते.**

भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे, जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारत अग्रस्थानी पोहोचण्याची चर्चा होत आहे. पण या वाढीचा पाया काय असणार हा मूलभूत प्रश्न आहे. केवळ सेवा क्षेत्र, आयटी उद्योग आणि अंतर्गत मागणी यावर मोठी अर्थव्यवस्था टिकत नाही. इतिहास पाहिला तर ब्रिटन, अमेरिका, जर्मनी, जपान, दक्षिण कोरिया, चीन या सर्व देशांनी औद्योगिकीकरणाच्या जोरावर आर्थिक शक्ती निर्माण केली. म्हणजेच औद्योगिक धोरण हा विकासाचा मुख्य पाया असतो. भारताने स्वातंत्र्यानंतर १९५६ च्या औद्योगिक धोरणातून राज्यनियंत्रित औद्योगिकीकरणाचा मार्ग स्वीकारला. त्या काळात जड उद्योग, सार्वजनिक क्षेत्र, परवाना व्यवस्था या माध्यमातून औद्योगिक पाया उभा करण्याचा प्रयत्न झाला. त्या धोरणामुळे पायाभूत उद्योग उभे राहिले; पण परवाना राज, कमी स्पर्धा आणि कमी उत्पादकता यामुळे उद्योग क्षेत्राची वाढ मर्यादित राहिली. १९९१ नंतर भारताने उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला आणि उद्योग क्षेत्रातील सरकारी नियंत्रण कमी केले. पण त्यानंतर भारताची अर्थव्यवस्था मुख्यतः सेवा क्षेत्रावर आधारित वाढू लागली. आयटी, वित्त, दूरसंचार, सेवा निर्यात या क्षेत्रांमध्ये भारताने मोठी प्रगती केली; पण उत्पादन क्षेत्राचा जीडीपीमधील वाटा अपेक्षेप्रमाणे वाढला नाही. त्यामुळे भारताची वाढ ही उत्पादनावर आधारित नसून सेवा क्षेत्रावर आधारित राहिली. अमेरिका, युरोप, चीन, जपान हे सर्व देश पुन्हा उद्योगांना प्रोत्साहन देत आहेत, सबसिडी देत आहेत, तंत्रज्ञान उद्योगांना संरक्षण देत आहेत. कारण जागतिक पुरवठा साखळी, तंत्रज्ञान, संरक्षण, ऊर्जा या सर्व क्षेत्रांत औद्योगिक क्षमता ही राष्ट्रीय सुरक्षेशी जोडली गेली आहे. भारतानेही उत्पादन प्रोत्साहन योजना, औद्योगिक कॉरिडॉर, पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक्स सुधारणा, सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स, संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रिक वाहन उद्योग या क्षेत्रांत धोरणात्मक हस्तक्षेप सुरू केले आहेत. उत्पादन क्षेत्र वाढवून रोजगार निर्माण करणे, आयात कमी करणे आणि निर्यात वाढवणे हा या धोरणांचा उद्देश आहे. उत्पादन क्षेत्र जीडीपीमध्ये मोठा वाटा देईल, असा दीर्घकालीन उद्देश ठेवण्यात आला आहे. परंतु औद्योगिक धोरण म्हणजे केवळ सबसिडी देणे किंवा कारखाने उभारणे नव्हे. औद्योगिक धोरण म्हणजे संपूर्ण औद्योगिक परिसंस्था निर्माण करणे. यात पायाभूत सुविधा, वीज, बंदरे, रेल्वे, लॉजिस्टिक्स, कौशल्य विकास, संशोधन, वित्तपुरवठा, बाजारपेठ, निर्यात धोरण या सर्व गोष्टींचा समावेश होतो. उद्योग एकट्याने वाढत नाही; तो संपूर्ण आर्थिक रचनेतून वाढतो. भारतासमोर एक मोठे आव्हान म्हणजे रोजगार. सेवा क्षेत्र अर्थव्यवस्था वाढवू शकते; पण मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याची क्षमता उत्पादन क्षेत्रात जास्त असते. चीनने औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून कोट्यवधी लोकांना रोजगार दिला आणि ग्रामीण लोकसंख्येला शहरांकडे आणून उत्पादन अर्थव्यवस्था उभी केली. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशासाठी उद्योग क्षेत्र वाढवणे ही आर्थिकच नव्हे तर सामाजिक गरज आहे. औद्योगिक धोरणात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तंत्रज्ञान आणि संशोधन. केवळ असेंब्ली उद्योग उभारून देश औद्योगिक महासत्ता बनत नाही. उच्च मूल्य उत्पादन, संशोधन, डिझाइन, तंत्रज्ञान विकास या गोष्टी महत्त्वाच्या असतात. औद्योगिकीकरण हा दहा वर्षांचा नव्हे तर पन्नास वर्षांचा प्रकल्प असतो. खासगी गुंतवणूक वाढली नाही तर औद्योगिक वाढ मर्यादित राहू शकते. त्यामुळे सरकारने उद्योगांसाठी वातावरण तयार करणे महत्त्वाचे आहे; पण उद्योगांनीही गुंतवणूक वाढवणे आवश्यक आहे. भारताच्या आर्थिक इतिहासात दोन टोकाचे प्रयोग झाले. एक म्हणजे पूर्ण सरकारी नियंत्रण असलेले औद्योगिकीकरण आणि दुसरे म्हणजे पूर्ण उदारीकरणानंतर सेवा क्षेत्रावर आधारित वाढ. आता भारत तिसऱ्या टप्प्यात आहे आणि तो म्हणजे धोरणात्मक औद्योगिकीकरण. यात सरकार दिशा देते, पायाभूत सुविधा निर्माण करते, प्रोत्साहन देते; पण उद्योग क्षेत्र खाजगी गुंतवणुकीवर आधारित वाढते. शेवटी भारत महासत्ता होणार का हा प्रश्न अनेकदा विचारला जातो. या प्रश्नाचे उत्तर जीडीपी वाढीत नाही, तर उत्पादन क्षमतेत आहे. जो देश उत्पादन करतो, तंत्रज्ञान तयार करतो, निर्यात करतो आणि औद्योगिक क्षमता वाढवतो तोच देश आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या शक्तिशाली बनतो. भारताची आर्थिक प्रगती ही नैसर्गिकरित्या होणार नाही; ती धोरणाने घडवावी लागेल. आणि म्हणूनच भारताचा विकास हा बाजाराने नव्हे, तर नियोजनबद्ध औद्योगिक धोरणाने ठरणार आहे.

# विभागलेल्या जगात व्यापार संघटनेचे महत्त्व

जागतिक व्यापार संघटना म्हणजेच डब्ल्यूटीओ ही संस्था अनेकांना कालबाह्य वाटते. तिचे निर्णय अडकतात, चर्चा वर्षानुवर्षे चालतात, मोठे देश नियम मोडतात, विवाद निवारण यंत्रणा अडखळते, असे अनेक आरोप तिच्यावर आहेत. हे सर्व काही अंशी खरेही आहे. पण याच कारणामुळे या संस्थेचे महत्त्व संपते असे नाही; उलट ते वाढते. कारण नियम नसलेला व्यापार हा शेवटी शक्तिशाली देशांच्या इच्छेवर चालतो.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक अर्थव्यवस्थेची जी रचना तयार झाली, त्यात आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार करार यांचा समावेश होता. त्यातून पुढे डब्ल्यूटीओ निर्माण झाली. या व्यवस्थेचा मूलभूत उद्देश एकच होता आणि तो म्हणजे देशांनी व्यापार युद्धे टाळावीत आणि नियमांवर आधारित व्यापार करावा. कारण १९३० च्या दशकात देशांनी परस्परांवर आयात शुल्क वाढवून जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का दिला होता.




डब्ल्यूटीओचे मुख्य काम तीन प्रकारचे आहे. पहिले म्हणजे व्यापार नियम तयार करणे, दुसरे म्हणजे व्यापार विवाद सोडवणे आणि तिसरे म्हणजे देशांनी नियम पाळले का हे पाहणे. जगातील बहुतांश व्यापार अजूनही या नियमांवर आधारित चालतो आणि म्हणूनच ती अजूनही जागतिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. पण गेल्या दशकात जग बदलले. अमेरिका चीन व्यापार युद्ध, ब्रेक्झिट, कोविडनंतरची पुरवठा साखळी समस्या, युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, तंत्रज्ञानावर निर्बंध, आर्थिक निर्बंध या सर्व गोष्टींमुळे जागतिकीकरणाचा वेग कमी झाला. देश आता मुक्त व्यापारापेक्षा सुरक्षित व्यापार, मित्र देशांशी व्यापार, देशांतर्गत उत्पादन यावर अधिक भर देत आहेत. या प्रक्रियेला अनेक अर्थतज्ज्ञ 'डी-ग्लोबलायझेशन' किंवा 'फ्रेंड-शोरिंग' असे म्हणतात.

या बदलाचा सर्वात मोठा परिणाम व्यापार संघटनेवर झाला. अनेक देश आता बहुपक्षीय कराराऐवजी द्विपक्षीय किंवा लहान गटांमध्ये व्यापार करार करत आहेत. म्हणजेच संघटनेच्या नियमांपेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे संघटनेच्या अधिकारावर प्रश्न निर्माण झाला आहे. तरीही ती महत्त्वाची का आहे, हा मुख्य प्रश्न आहे. त्याचे उत्तर साधे आहे. कारण संघटना नसल्यास जागतिक व्यापार पूर्णपणे शक्तीच्या राजकारणावर चालेल. मोठे देश छोटे देशांवर आयात शुल्क लावतील, निर्यात बंदी करतील, आर्थिक दबाव आणतील आणि त्याविरोधात छोट्या देशांकडे कोणतेही व्यासपीठ राहणार नाही. संघटनेची विवाद निवारण यंत्रणा ही जागतिक अर्थव्यवस्थेतील सर्वात सक्रिय आंतरराष्ट्रीय न्याय प्रणाली मानली जाते.

आज जग विभागले जात असताना अशा संस्थांचे महत्त्व वाढते. कारण जेव्हा देश एकमेकांशी सहमत असतात तेव्हा संस्थांची गरज कमी असते; पण जेव्हा देशांमध्ये मतभेद वाढतात तेव्हा मध्यस्थी करणाऱ्या संस्थांची गरज वाढते. आज जगात अमेरिका, चीन, युरोप, रशिया, भारत अशा वेगवेगळ्या शक्तिकेंद्रांमध्ये स्पर्धा वाढत आहे. अशा वेळी जागतिक व्यापारासाठी एक समान व्यासपीठ असणे आवश्यक आहे. संघटनेच्या अडचणीही गंभीर आहेत. विवाद निवारण यंत्रणा पूर्णपणे कार्यरत नाही, नवीन व्यापार नियमांवर सहमती होत नाही, डिजिटल व्यापार, पर्यावरण, सबसिडी, कृषी व्यापार या विषयांवर मतभेद आहेत. त्यामुळे अनेक तज्ज्ञ ही संस्था सर्वात मोठ्या संकटात असल्याचे म्हणतात. जागतिक व्यापारातील वाढता संरक्षणवाद आणि बदललेली अर्थव्यवस्था यामुळे व्यापार संघटनेत सुधारणा करणे अत्यावश्यक झालेआहे.

> **» आज जगात व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि राजकारण यांचे नवे गट तयार होत आहेत. जागतिकीकरणाचा एकसंध काळ संपत चालला आहे आणि त्याजागी विभागलेले, स्पर्धात्मक जग उभे राहत आहे. अशा काळात जागतिक व्यापारासाठी नियम आणि व्यासपीठ देणाऱ्या संस्थांचे महत्त्व अधिक वाढले आहे.**

भारतासारख्या देशासाठी ती अधिक महत्त्वाची आहे. कारण भारत मोठी अर्थव्यवस्था असली तरी व्यापारात अजूनही विकसित देशांइतकी ताकद नाही. व्यापार संघटनेसारखी संस्था असल्यामुळे भारत कृषी, अन्न सुरक्षा, औषधे, सेवा व्यापार या विषयांवर आपले हित जपण्याचा प्रयत्न करू शकतो. बहुपक्षीय व्यवस्था नसती तर व्यापार करार पूर्णपणे शक्तिशाली देशांच्या अटींवर झाले असते. अर्थव्यवस्थेचा इतिहास पाहिला तर एक गोष्ट स्पष्ट दिसते. नियमांवर आधारित व्यवस्था असताना व्यापार वाढतो, अर्थव्यवस्था वाढते आणि देशांमधील संघर्ष कमी होतात. नियम नसलेली व्यवस्था शेवटी व्यापार युद्ध आणि राजकीय संघर्ष यांकडेच जाते. आज आर्थिक गट तयार होत आहेत, व्यापार राजकारणाचा भाग बनत आहे.

जागतिक व्यापार संपलेला नाही. आणि व्यापार चालू राहणार असेल तर त्यासाठी नियम, व्यासपीठ आणि मध्यस्थी करणारी संस्था आवश्यकच राहणार आहे. ही फक्त एक संस्था नाही; तर ती जागतिक व्यापार नियमांची कल्पना आहे. आणि जग जितके विभागले जाईल तितकी त्या कल्पनेची गरज अधिक वाढत जाईल.

# मावळमध्ये 'ॲम्ब्युलन्स रॅकेट'चा आरोप

## आरोग्यमंत्री घटनास्थळी, चौकशीचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मावळ तालुक्यात सरकारी आरोग्य यंत्रणेभोवती फिरणाऱ्या कथित 'ॲम्ब्युलन्स रॅकेट'प्रकरणी मोठा वाद निर्माण झाला असून, या प्रकाराची दखल घेत राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वतः घटनास्थळी भेट देत पाहणी केली. प्राथमिक माहितीनुसार, रुग्णवाहिका सेवेत अनियमितता, अवाजवी दर आकारणी आणि रुग्णांच्या गैरसोयीचे प्रकार समोर आल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मावळ परिसरातील काही खासगी ॲम्ब्युलन्स चालकांनी रुग्णांना सरकारी रुग्णालयाऐवजी विशिष्ट खासगी रुग्णालयांकडे वळवण्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात आला आहे. यामध्ये रुग्णांकडून जादा पैसे आकारले जात असल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक फटका बसत असून, आपत्कालीन सेवांवरचा विश्वास डळमळीत होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.




प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "रुग्णसेवा ही नफा कमावण्याचे साधन बनू नये. अशा प्रकारांना अजिबात थारा दिला जाणार नाही." दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी, स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणा यांनाही तपासात समन्वय साधण्याच्या सूचना देण्यात आल्या. ॲम्ब्युलन्स सेवांचे दर, कॉल नोंदी, रुग्ण वाहतुकीचे तपशील आणि संबंधित रुग्णालयांशी असलेले संबंध यांची सखोल चौकशी केली जाणार आहे.

स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. "रुग्णांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या अशा रॅकेटचा पर्दाफाश होणे आवश्यक आहे," असे मत व्यक्त होत आहे. या कारवाईनंतर मावळ तालुक्यातील आरोग्य सेवांमध्ये पारदर्शकता आणि शिस्त येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पुढील काही दिवसांत चौकशी अहवाल समोर येण्याची शक्यता असून, त्यानुसार पुढील कारवाई निश्चित केली जाणार आहे.

# तळेगावात स्थायी समितीसह सर्व समित्या बिनविरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तळेगाव दाभाडे :** तळेगाव दाभाडे नगर परिषद येथे विविध विषय समित्यांसह स्थायी समितीची निवड बिनविरोध पार पडली. विशेष सभेत समित्यांच्या सभापती व सदस्यांची निवड करण्यात आली. सर्व पदांवर एकमेव अर्ज आल्यामुळे या निवडी बिनविरोध झाल्या.

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नगर परिषद कार्यालयात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. विषय समित्यांवरील सदस्यांचे नामनिर्देशन, सभापतींची निवड तसेच स्थायी समिती गठित करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. स्थायी समितीच्या सभापतीपदी संतोष दाभाडे पाटील यांची निवड झाली. तसेच पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीच्या सभापतीपदी गणेश काकडे, स्वच्छता वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी निखिल भगत, सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी सुदाम शेळके, नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी दीपक भेगडे, शिक्षण क्रीडा व सांस्कृतिक कार्य समितीच्या सभापतीपदी भारती धोत्रे, तर महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी शैलजा काळोखे यांची निवड झाली. पीठासीन अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी समिती गठित करण्याबाबत माहिती दिली. प्रत्येक समितीच्या सभापतीपदासाठी एकच अर्ज आल्यामुळे निवडणूक प्रक्रिया न घेता सर्वांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

# लोणावळ्यात नगरपरिषद वादावर अखेर पडदा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणावळा :** नगर परिषदेमधील सत्ताधारी पक्षाचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवक यांनी २० मार्च रोजी लोणावळा नगर परिषदेमधील मुख्याधिकारी यांच्या कार्यालयाला कुलूप लावत त्यांच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदवला होता. तर, मुख्याधिकारी यांनी माझ्याकडे कोणतीही फाईल प्रलंबित नसल्याचे सांगत कामाच्या बाबतीमध्ये चोख असल्याचे म्हटले होते. शासकीय कार्यालयाला कुलूप लावण्याची लोकप्रतिनिधींची ही कृती कायदा व्यवस्थेला धरून नसल्याने जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने तहसीलदार विक्रम देशमुख यांनी पोलिस बंदोबस्तामध्ये कार्यालयाला लावण्यात आलेले कुलूप काढले.

आमदार सुनील शेळके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये २७ मार्च रोजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवक तसेच मावळचे प्रांत अधिकारी, तहसीलदार व मुख्याधिकारी यांची बैठक झाली. यात लोकप्रतिनिधींच्या भावना व मुख्याधिकारी यांची बाजू ऐकून घेतली. यानंतर मुख्याधिकारी यांनी नागरिक, लोकप्रतिनिधी व विकासकामांना अधिकचा वेळ देण्याचे मान्य केले आहे. तसेच, त्यांनी त्याबाबतची सकारात्मकता दाखवल्यानंतर लोकप्रतिनिधींनी त्यांचा मुख्याधिकारी म्हणून स्वीकार केला.

# घरपट्टी नोटिसांबाबत पालिकेने समन्वय साधावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** घरपट्टी थकबाकीबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून नागरिकांना व्हॉट्सॲप संदेश पाठविले जात असले, तरी पुनर्विकास सुरू असलेल्या इमारतीतील नागरिकांना यामुळे अडचणी निर्माण होत असल्याने संबंधित विभागांमध्ये समन्वय आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

गेल्या महिनाभरापासून घरपट्टी न भरलेल्या नागरिकांना महापालिकेकडून 'घरपट्टी भरा' असे संदेश पाठविले जात आहेत. मात्र अनेक नागरिकांच्या इमारतींचा पुनर्विकास सुरू असल्याने ते सध्या दुसऱ्या ठिकाणी भाड्याच्या घरात राहत आहेत. अशा परिस्थितीत त्यांना



घरपट्टीबाबत संदेश येत असल्याने संभ्रम आणि नाराजी निर्माण होत आहे.

नागरिकांच्या मते, एखाद्या इमारतीचा पुनर्विकास सुरू असल्याची माहिती बांधकाम विभागाकडे असते. ही माहिती कर आकारणी विभागाला देणे आवश्यक आहे. विभागांमध्ये समन्वय नसल्यामुळे नागरिकांना विनाकारण नोटिसा व संदेश येत असल्याची तक्रार करण्यात येत आहे. पुनर्विकास प्रकल्पांमुळे मूळ घरात राहणे शक्य नसताना घरपट्टी भरण्याबाबत संदेश येत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे महापालिकेच्या संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधून अशा प्रकरणांमध्ये योग्य ती दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. नागरिकांना अनावश्यक त्रास होऊ नये यासाठी पुनर्विकास प्रकल्पांची माहिती कर विभागाला देणे आणि त्यानुसार घरपट्टी प्रक्रियेत आवश्यक बदल करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

# बावधनमध्ये हायड्रोपोनिक गांजा जप्त; दोन तरुण अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** बावधन परिसरात अंमली पदार्थांविरोधातील कारवाईत पोलिसांनी मोठी कामगिरी करत हायड्रोपोनिक गांजा जप्त केला असून दोन तरुणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



ही कारवाई २८ मार्च २०२६ रोजी पहाटे म्हाळुंगे येथील वास्कायबे सोसायटीजवळ रस्त्याकडेला करण्यात आली. गुन्हे शाखा युनिट-२चे पोलीस शिपाई सुखदेव गावंडे यांच्या फिर्यादीवरून बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये गौरव रमेश कुंटे (वय २४) आणि विवेक सुनिल चौधरी (वय २१) यांचा समावेश आहे. दोघेही बावधन परिसरातील रहिवासी असून त्यांच्याकडून सुमारे ६० ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या गांजाची अंदाजे किंमत सुमारे ६.५० लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपी हे अंमली पदार्थ विक्रीसाठी बेकायदेशीररित्या साठवून ठेवत असल्याचे तपासात समोर आले आहे.या प्रकरणी एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक साळुंखे करत आहेत.

# सीएमईजीपी लोनच्या आमिषाने लाखोंची फसवणूक; भोसरीतील दोघांवर गुन्हा







■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पिंपरी-चिंचवड : मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) अंतर्गत कर्ज मंजूर करून देण्याचे आमिष दाखवत लाखोंची फसवणूक केल्याचा प्रकार भोसरीत उघडकीस आला आहे. या प्रकरणी भोसरी पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना २०२३ ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान पुणे-नाशिक महामार्गावरील योगिराज असोसिएट्स कार्यालयात घडली. फिर्यादी शांताराम मारुती शिर्के (वय ५४, रा. येरंडवना, पुणे) यांनी तक्रार दिली आहे.

आरोपी सोमनाथ पठारे (वय ४०) व शुभम पाटील (वय ३०, दोघेही रा. भोसरी) यांनी CMEGP योजनेअंतर्गत कर्ज मंजूर करून देण्याचे तसेच अनुदान मिळवून देण्याचे आमिष दाखवले. यासाठी बँक व जिल्हा उद्योग केंद्रातील अधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागतात, असे सांगून फिर्यादी व इतरांकडून वेळोवेळी रक्कम उकळली.

या प्रकारात आरोपींनी सुमारे ५ लाख ४६ हजार ५०० रुपये रोख व बँक खात्यांद्वारे घेत फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खाडे करत आहेत.

# ड्युटीवरून घरी परतताना पोलीस जवानाचा दुर्दैवी मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेल्या पोलीस शिपायाचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे पोलीस दलात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीसी/2043 शशिकांत श्रीधर होले हे सध्या सांगली जिल्ह्यातील तुरची येथे प्रशिक्षणासाठी गेले होते. रविवारी सुट्टी असल्याने ते २८ मार्च रोजी रात्री घरी परतत होते. रात्री सुमारे १०.४५ वाजता राजगुरुनगरहून होलेवाडीच्या दिशेने जात असताना खेड पोलीस स्टेशन हद्दीतील टाकळकरवाडी फाट्याजवळ ही दुर्घटना घडली. समोरून अचानक रिक्षा आल्याने होले



यांनी बुलेट मोटारसायकलचा ब्रेक मारला. मात्र, वाहन घसरल्याने ते रस्त्यावर पडले आणि त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. स्थानिकांनी तत्काळ त्यांना उपचारासाठी चाकण येथील युनिकेअर हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या घटनेमुळे पोलीस विभागात शोककळा पसरली असून सहकाऱ्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### खामगावात ४ लाख ८७ हजारांचा गांजा जप्त

**दौंड :** दौंड तालुक्यातील खामगाव येथे अवैधरित्या गांजा साठवून विक्री करणाऱ्या व्यक्तीवर यवत पोलिसांनी एन.डी.पी.एस. कायद्यांतर्गत कारवाई करत सुमारे ४ लाख ८७ हजार ९०० रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे. यवत पोलीस ठाणे हद्दीतील खामगाव येथील पाण्याच्या टाकीजवळील पत्र्याच्या शेडमध्ये एक व्यक्ती अवैधरित्या गांजा साठवून विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक विजय कोल्हे, पोलीस उपनिरीक्षक अक्षय मोरे, पोलीस अंमलदार तसेच अंमली पदार्थ विरोधी पथक, कोल्हापूर परीक्षेत्र, पंच व फॉरेन्सिक टीम यांच्या उपस्थितीत संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. छाप्यामध्ये आकाश अशोक मोहिते (रा. खामगाव) हा संशयास्पद स्थितीत आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडून व पत्र्याच्या शेडमधून एकूण सुमारे ८ किलोपेक्षा जास्त वजनाचा गांजा मिळून आला.

### विहिरीत बुडून तरुणाचा मृत्यू

**उरुळी कांचन :** पोहण्यासाठी गेलेला सुमारे १९ ते २० वर्षे वयोगटातील एक तरुण विहिरीत बुडाल्याची घटना सोरतापवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील गुंजाळ मळा परिसरात रविवारी दुपारी घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. ही घटना रविवारी दुपारी अडीच ते पावणे तीन वाजण्याच्या सुमारास घडली. पोहण्यासाठी विहिरीत उतरलेल्या तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. बुडालेल्या तरुणाचे नाव समजू शकले नाही. उरुळी कांचन पोलीस ठाणे येथील पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

## ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात राज्यात प्रथम

# पुणे जिल्हा परिषद राज्यात अव्वल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात पुणे जिल्हा परिषद राज्यात प्रथम क्रमांकावर आली असून या कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा परिषदेचे कौतुक केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

राज्य शासनाने प्रशासन अधिक पारदर्शक, जलद व नागरिकाभिमुख करण्यासाठी १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविला होता. या कार्यक्रमात राज्यातील विविध जिल्हा परिषदांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यात आले. त्यामध्ये पुणे जिल्हा परिषदेला २०० पैकी १९६.२५ गुण मिळाले आणि राज्यात प्रथम क्रमांक मिळवला.



या मूल्यांकनामध्ये कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि जीआयएस प्रणालीचा वापर अशा सात निकषांवर कामगिरी तपासण्यात आली. या सर्व क्षेत्रांमध्ये पुणे जिल्हा परिषद आघाडीवर राहिली.

जिल्हा परिषद प्रशासनाने डिजिटल प्रशासनासाठी अत्याधुनिक संकेतस्थळ, एआय चॅटबॉट, डिजिटल डॅशबोर्ड, जीआयएस आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे केला आहे. यामुळे नागरिकांना विविध योजना, कागदपत्रे, तक्रारी, सेवा आणि माहिती ऑनलाईन उपलब्ध झाली आहे. ई-ऑफिस प्रणालीमुळे कागदविरहित प्रशासनाला गती मिळाली असून कार्यालयीन कामकाज जलद झाले आहे.

जिल्हा परिषदेकडून 'पुणे झेडपी संवाद' या व्हॉट्सअॅप आधारित एआय चॅटबॉटची सुविधा सुरू करण्यात आली असून नागरिकांना शाळा, आरोग्य केंद्र, योजना, तक्रार निवारण याबाबत २४ तास माहिती मिळते. सर्व सेवा ऑनलाईन उपलब्ध करून प्रशासन अधिक पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यावर भर देण्यात आला आहे.

या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा परिषद प्रशासनाचे अभिनंदन केले असून डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक चांगल्या सेवा देण्याचे काम पुणे जिल्हा परिषद करत असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या नेतृत्वाखाली अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे ही कामगिरी शक्य झाली असल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाने सांगितले.

## खडकवासला धरणसाखळीत समाधानकारक पाणीसाठा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत यंदा समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध असून उन्हाळ्यात पाणीटंचाईची शक्यता कमी असल्याचे चित्र आहे. जलसंपदा विभागाच्या माहितीनुसार खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरणांमधील एकूण पाणीसाठा गेल्या वर्षाच्या तुलनेत अधिक असल्याने पुणेकरांना दिलासा मिळाला आहे.

खडकवासला धरण साखळीतील धरणांमधील एकत्रित पाणीसाठा फेब्रुवारी २०२६ अखेर सुमारे १७.९६ टीएमसी इतका होता, जो गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत सुमारे १७.२० टीएमसी पाणीसाठा होता. त्यामुळे यंदा पाणीस्थिती तुलनेने चांगली असल्याचे जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे.

पुणे शहराचा पाणीपुरवठा प्रामुख्याने खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांवर अवलंबून आहे. वरच्या धरणांमधून पाणी सोडून ते खडकवासला धरणात जमा केले जाते आणि त्यानंतर प्रक्रिया करून पुणे शहराला पाणीपुरवठा केला जातो. या चार धरणांमधील मागील वर्षाच्या तुलनेत जास्त असल्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी कपात करण्याची गरज भासणार नाही. धरणांमधील पाणीसाठा सुमारे ६७ टक्के इतका होता, जो मागील वर्षापेक्षा अधिक असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

दरम्यान, शहरातील वाढती लोकसंख्या, वाढता पाणी वापर आणि उन्हाळ्यातील वाढती मागणी लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# अल्पवयीन गुन्हेगारीत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** जुन्नर तालुक्यात अल्पवयीन मुलांमध्ये वाढत चाललेली गुन्हेगारी प्रवृत्ती आणि त्यातून घडणाऱ्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये समुपदेशनाची गरज असल्याचे मत नागरिकांतून पुढे येत आहे.

धार्मिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या या तालुक्यात अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांमधील भांडणे, वाद आणि त्यातून होणारे गंभीर प्रकार वाढताना दिसत आहेत. काही दिवसांपूर्वी वडगाव आनंद येथील एका शैक्षणिक संस्थेत दोन विद्यार्थ्यांमधील वादाचे रूपांतर हिंसक घटनेत झाले. या घटनेत एका अल्पवयीन विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला करून त्याला गंभीर जखमी करण्यात आले होते. सुदैवाने या विद्यार्थ्याचे प्राण वाचले असले तरी कुटुंबाला मानसिक



व आर्थिक ताण सहन करावा लागत आहे.

या घटनेनंतरही परिस्थितीत सुधारणा न होता ओतूर येथील एका परीक्षा केंद्रावर दहावीचा पेपर देण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यावर महाविद्यालयीन तरुणाने कोयत्याने हल्ला केल्याची घटना घडली. संबंधित विद्यार्थ्याने हा वार हातावर झेलल्याने मोठा अनर्थ टळला. अशा प्रकारच्या घटना घडत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये आक्रमकता आणि न्यूनगंड वाढत असल्याची चर्चा आहे.

तज्ज्ञांच्या मते, मोबाईल, टेलिव्हिजन आणि सोशल मीडियावरील अयोग्य सामग्रीचा प्रभाव अल्पवयीन मुलांवर पडत असून, त्यातून हिंसक प्रवृत्ती वाढीस लागते. त्यामुळे शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सत्रे आयोजित करून त्यांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडवून आणणे गरजेचे आहे. पालकांनीही आपल्या पाल्यांवर लक्ष ठेवून त्यांना योग्य संस्कार देणे आवश्यक आहे.

दरम्यान, अल्पवयीन मुलांना वाहन चालवण्यासाठी देण्याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहे. शाळा व महाविद्यालयांकडून सूचना देऊनही काही विद्यार्थी बेफाम वाहन चालवताना दिसतात. अशा प्रकरणांमध्ये संबंधित वाहनमालक व पालकांवर कारवाई करून जागृती करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. तसेच शैक्षणिक परिसरात विनाकारण फिरणाऱ्या तरुणांवरही योग्य ती कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# धुळीमुळे निरगुडसर परिसरातील नागरिक त्रस्त

## रस्त्याच्या कामाचा वेग मंदावला; नागरिकांना नाहक त्रास



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** अवसरी फाटा ते निरगुडसर (ता. आंबेगाव) मार्गे जांबूत (ता. शिरूर) या रस्त्याचे काम सध्या सुरू असले तरी कामाचा वेग मंद असून रस्त्यावर उडणाऱ्या धुळीमुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्चून रस्त्याचे काम सुरू असताना नागरिकांना मात्र धुळीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

निरगुडसर परिसरातील मेंगडेवाडी ते येवले वस्ती दरम्यान रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र काम संथ गतीने सुरू असल्याने रस्ता कच्च्या अवस्थेत आहे.

या रस्त्यावरून लहान-मोठी तसेच अवजड वाहने मोठ्या प्रमाणात धावत असल्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे.

उडणाऱ्या धुळीमुळे निरगुडसर फाटा, हांडेवस्ती, थोरात वस्ती, येवलेवस्ती व शिक्षक चाळ परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. वाहन गेल्यानंतर धुळीचे मोठे लोट उडून शेजारील घरे व शेतांवर बसतात. त्यामुळे पिकांचे नुकसान होत असून नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे.

रस्त्यावरील धूळ कमी करण्यासाठी ठेकेदाराकडून पाणी मारले जात असल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात नियमित पाणी मारले जाते का, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. याबाबत संबंधित ठेकेदाराशी अनेक वेळा संपर्क करण्याचा प्रयत्न केला, मात्र संपर्क होऊ शकला नसल्याचे नागरिकांनी सांगितले.

या समस्येकडे स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनिधी लक्ष देत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

रस्त्याचे काम पूर्ण होण्यास वेळ लागला तरी चालेल, पण धूळ उडणार नाही यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# जुन्नर तालुक्यात अवैध गांजा लागवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** पुणे ग्रामीण जिल्ह्यात अवैध गांजा लागवड व विक्रीवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमेला मोठे यश मिळाले असून जुन्नर तालुक्यातील इंगळून येथे शेतात गांजाची झाडे लावणाऱ्या शेतकऱ्याला पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत सुमारे ८० गांजाची झाडे जप्त करण्यात आली आहेत.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेकडून अवैध गांजा लागवडीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच दरम्यान पोलीस निरीक्षक प्रमोद शिरसागर यांना गोपनीय माहिती मिळाली की, इंगळून परिसरातील एका शेतात अवैधरित्या गांजाची लागवड करण्यात आली आहे. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा व जुन्नर पोलीस ठाणे यांच्या पथकाने संयुक्त कारवाई करत




संबंधित शेतात छापा टाकला. छाप्यामध्ये गहू व बाजरीच्या पिकांमध्ये गांजाची झाडे लपवून लावलेली आढळून आली.

चौकशीदरम्यान हे शेत दिनकर विठ्ठल डामसे (वय ६०, रा. इंगळून) यांचे असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गांजाची लागवड केल्याची कबुली दिली.

पंचांसमक्ष पंचनामा करून सुमारे ८० गांजाची झाडे जप्त करण्यात आली असून या प्रकरणी पोलीस अंमलदार अजित गेंगजे यांनी फिर्याद दिली आहे. पुढील तपास जुन्नर पोलीस ठाण्याकडून सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद शिरसागर, पोलीस निरीक्षक किरण अवचर, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, अरविंद गाटकुळ तसेच पोलीस कर्मचारी रघुनाथ शिंदे, ऋषिकेश तिटमे, दीपक साबळे, संदीप वारे, अक्षय नवले, राजू मोमिन, सागर हिले, सागर शिंदे, गणेश शिंदे, अजित गेंगजे, संतोष पठारे यांच्या पथकाने पार पाडली.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रेरणा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक संघ आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रेरणा पुरस्कार वितरण सन्मान सोहळा नारायणगाव येथील निलायम गार्डन मंगल कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. तालुक्यातील शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला शिक्षक व मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य शिक्षक नेते संभाजीराव थोरात होते. ज्येष्ठ मराठी साहित्यिक कवी फ. मु. शिंदे यांनी आपल्या कवितांमधून आईचे महत्त्व व आईवरील कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिवजन्मभूमी जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी आपल्या मनोगतात प्राथमिक शिक्षकांच्या प्रश्नांवर राज्यस्तरावर मंत्रीमहोदयांसमवेत सकारात्मक चर्चा करून शिक्षकांना केवळ अध्यापनाचेच काम देण्याची मागणी करणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमास पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य गुलाबशेठ पारखे, मंगेश काकडे, पंचायत समिती जुन्नर सभापती कमलताई शेळकंदे, उपसभापती अमित ढोले, पंचायत समिती सदस्य सुषमा वाव्हळ, संजय वऱ्हाडी, संभाजीराव चव्हाण, शांताराम दाते, राजेंद्र पिंगट, गटनेते जयसिंग पोटे, पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाचे उपाध्यक्ष भाऊ देवाडे, विघ्नहर साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर, शिवसेना जुन्नर तालुकाप्रमुख योगेश पाटे, सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर, गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे, शिक्षक संघ राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे, साने गुरुजी कथामाला जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कानडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


या कार्यक्रमात जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या डायरीचे प्रकाशन करण्यात आले. तसेच सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर यांच्यासह तीन केंद्रप्रमुख, दोन मुख्याध्यापक, सहा पदवीधर शिक्षक, एक्याऐंशी उपशिक्षक व एक विषय शिक्षक यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक, शाल, गुलाबपुष्प व फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रास्ताविक महिला आघाडी अध्यक्षा शुभदा गाढवे यांनी केले. सूत्रसंचालन सुनिता वामन व प्रभाकर दिघे यांनी केले तर आभार संदिप शिंदे यांनी मानले.

## चाकण बाजारभाव: कांद्याचे दर घसरले, उलाढाल ६ कोटी १० लाख

# कांदा, वाटाणा व टोमॅटोची विक्रमी आवक झाल्याने दर घसरले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये रविवारी कांदा, वाटाणा व टोमॅटोची विक्रमी आवक झाली. आवक वाढल्यामुळे कांद्याच्या दरात घसरण झाली असून पालेभाज्या व काही फळभाज्यांच्या दरातही नरमाई दिसून आली. दिवसभरात बाजाराची एकूण उलाढाल सुमारे ६ कोटी १० लाख रुपये झाली.



चाकण येथील खेड कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये कांद्याची एकूण ९ हजार ५०० क्विंटल आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक सुमारे १ हजार ५०० क्विंटलने वाढल्याने कांद्याच्या दरात सुमारे १०० रुपयांची घसरण झाली. कांद्याचा कमाल भाव १,४०० रुपयांवरून १,३०० रुपयांवर स्थिरावला. मध्यम प्रतीच्या कांद्याला १,१०० रुपये तर हलक्या प्रतीच्या कांद्याला सुमारे ८०० रुपये भाव मिळाला.

बटाट्याची एकूण आवक १,१०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत आवक ३०० क्विंटलने घटल्यामुळे बटाट्याच्या दरात सुमारे १०० रुपयांची वाढ झाली. बटाट्याचा कमाल भाव १,२०० रुपयांवरून १,३०० रुपयांपर्यंत पोहोचला. लसणाची आवक ५० क्विंटल झाली असून भाव १२ हजार रुपयांवर स्थिर राहिले. हिरव्या मिरचीची ३४० क्विंटल आवक झाली असून तिला ५ हजार ते ६,५०० रुपये दर मिळाला.

फळभाज्यांच्या बाजारात टोमॅटोची २९४ क्विंटल आवक झाली असून त्याला प्रति दहा किलोसाठी १,००० ते १,५०० रुपये भाव मिळाला. कोबी २३२ क्विंटल (४०० ते ६०० रुपये), फ्लॉवर २०५ क्विंटल (८०० ते १,४०० रुपये), वांगी ९२ क्विंटल (१,००० ते २,००० रुपये), भेंडी ८४ क्विंटल (२,५०० ते ४,००० रुपये), दोडका ५७ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रुपये), कारली ६७ क्विंटल (२,००० ते ३,००० रुपये), दुधीभोपळा ६२ क्विंटल (१,००० ते १,६०० रुपये), काकडी ९३ क्विंटल (१,००० ते १,६०० रुपये) अशी आवक झाली. तसेच फरशी २० क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), वालवड ४२ क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), ढोबळी मिरची १४९ क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), चवळी ४२ क्विंटल (१,५०० ते २,५०० रुपये), वाटाणा ७० क्विंटल (४,५०० ते ५,५०० रुपये), शेवगा ३५ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रुपये), गाजर ५७ क्विंटल (१,००० ते २,००० रुपये), गवार ४८ क्विंटल (५,००० ते ७,००० रुपये), आले १५५ क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये) अशी आवक झाली.

पालेभाज्यांमध्ये मेथीच्या १३ हजार ९७० जुड्या बाजारात आल्या असून त्यांना ५०० ते ८०० रुपये भाव मिळाला. कोथिंबीर २६ हजार १५० जुड्या (४०० ते ७०० रुपये), शेपू २ हजार ५५४ जुड्या (६०० ते ८०० रुपये), पालक २ हजार ८३८ जुड्या (४०० ते ६०० रुपये) अशी आवक झाली. पालेभाज्यांची आवक वाढल्यामुळे दरात घसरण झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

जनावरांच्या बाजारात २५ गाईंची विक्री झाली असून त्यांना १५,००० ते ७०,००० रुपये दर मिळाला. ५५ बैलांपैकी ४५ बैलांची विक्री झाली असून त्यांना १०,००० ते ४०,००० रुपये भाव मिळाला. ८० म्हशींपैकी ५५ म्हशींची विक्री झाली असून त्यांना ३०,००० ते ८०,००० रुपये दर मिळाला. शेळ्या-मेंढ्यांपैकी ८,१०० पैकी ७,६०० शेळ्यांची विक्री झाली.

## सारांश वृत्त

### जम्मू, उधमपूरमध्ये तस्करांना अटक

**जम्मू:** जम्मू आणि काश्मीरमधील जम्मू आणि उधमपूर जिल्ह्यांत दोन वेगवेगळ्या ठिकाणी रविवारी हेरॉइनसह चार कथित अमली पदार्थ तस्करांना अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली. येथील डोमाना परिसरातील मुठी येथे मोहित शर्मा, अंकित महाजन आणि अंकित भट यांना अडवून त्यांची झडती घेण्यात आली, ज्यामध्ये ७.२१ ग्रॅम हेरॉइन जप्त करण्यात आले, अशी माहिती पोलीस प्रवक्त्याने दिली.

### झारखंडमध्ये हत्तीने महिलेला चिरडले

**कोडरमा :** झारखंडच्या कोडरमा जिल्ह्यात रविवारी एका जंगली हत्तीने ५५ वर्षीय महिलेला चिरडून ठार केले, अशी माहिती पोलिसांनी दिली. मार्कोचो पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जामू हरलाडीह गावात, सीता देवी नावाची महिला पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास तिच्या घराजवळील जंगलात महुआची फुले आणायला गेली असताना ही घटना घडली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. "जंगलात एका जंगली हत्तीने तिला चिरडून ठार केले. तिचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी कोडरमा सदर रुग्णालयात पाठवण्यात आला आहे," अशी माहिती पोलिसांनी दिली. हत्तींचा प्रदेशात उपद्रव वाढला आहे.

### बॉम्बची धमकी देणाऱ्याला अटक

**म्हैसूर (कर्नाटक) :** सरकारी कार्यालये, शाळा आणि न्यायालयांना बॉम्बच्या खोट्या धमक्या पाठवून घबराट पसरवल्याच्या आरोपाखाली दिल्ली पोलिसांनी म्हैसूरमधून एका व्यक्तीला अटक केली आहे, अशी माहिती पोलीस सूत्रांनी रविवारी दिली. श्रीनिवास नावाचा आरोपी शहरातील वृंदावन लेआउट, सेकंड फेज, सिक्स्थ क्रॉस येथील एका घरातून आपले काम चालवत असल्याचे आढळून आले. तो अत्याधुनिक स्फोटांचा इशारा देणारे अनेक धमकीचे ईमेल पाठवून मोठ्या प्रमाणावर भीतीचे वातावरण निर्माण करत होता, असे सूत्रांनी सांगितले.

## अमेरिकेच्या अहवालात सविस्तर माहिती प्रसिद्ध

# दहशतवादी गटांना पाकमध्ये आश्रय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**वॉशिंग्टन :** पाकिस्तान आपल्या भूमीवर दहशतवादी संघटनांना आश्रय देत असून त्यामध्ये भारताला लक्ष्य करणाऱ्या, विशेषतः जम्मू-काश्मीरमध्ये सक्रिय गटांचा समावेश असल्याचे अमेरिकेच्या काँग्रेस रिसर्च सर्व्हिस च्या अहवालातून समोर आले आहे. 'टेररिस्ट अँड अदर मिलिटंट ग्रुप्स इन पाकिस्तान' या अहवालात ही माहिती देण्यात आली असून २५ मार्च रोजी हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला.

अहवालानुसार, अमेरिकन कायद्यानुसार परदेशी दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलेल्या १५ गटांपैकी १२ गट इस्लामी कट्टरतावादी विचारसरणीने प्रेरित आहेत. या संघटनांचे भारत व काश्मीर-केंद्रित, जागतिक, अफगाणिस्तान-केंद्रित, देशांतर्गत आणि शिया-विरोधी अशा पाच प्रकारांत वर्गीकरण करण्यात आले आहे.

भारत व काश्मीरकेंद्रित गटांमध्ये लष्कर-ए-तय्यबा, जैश-ए-मोहम्मद, हरकत-उल-जिहाद अल-इस्लामी, हरकत-उल-मुजाहिदीन आणि हिजबुल मुजाहिदीन या संघटनांचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आले आहे. हे गट पाकिस्तानच्या भूभागावरून कार्यरत असल्याचे अहवालात म्हटले आहे. हिजबुल मुजाहिदीनची स्थापना १९८९ मध्ये झाली असून २०१७ मध्ये अमेरिकेने तिला परकीय दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले. हा गट काश्मीरमधील सक्रिय असलेल्या सर्वात जुन्या व मोठ्या दहशतवादी संघटनांपैकी एक मानला जातो. या अहवालात २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या मुंबई दहशतवादी हल्ल्याचा व उल्लेख करण्यात आला असून, या हल्ल्यामागे लष्कर-ए-तय्यबाचा हात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. जागतिक स्तरावर कार्यरत गटांमध्ये अल-कायदा, अल-कायदा इन इंडियन सबकॉन्टिनेंट आणि इस्लामिक स्टेट खोरासान प्रांत यांचा समावेश आहे. तर अफगाणिस्तानकेंद्रित गटांमध्ये तालिबान आणि हक्कानी नेटवर्क यांचा उल्लेख करण्यात आला आहे. अहवालानुसार, १९८० च्या दशकापासून पाकिस्तान अनेक दहशतवादी गटांसाठी तळ राहिला आहे. २०१४ मध्ये दहशतवादाविरोधात राष्ट्रीय कृती योजना जाहीर करण्यात आली होती, मात्र दहशतवादी संघटनांचे पूर्ण उच्चाटन करण्यात अपयश आले आहे.

पाकिस्तानमध्ये दहशतवादाशी संबंधित मृत्यूंची संख्या २०१९ मधील ३६५ वरून २०२५ मध्ये ४,००१ इतकी वाढल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. तसेच फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स ने २०१८ मध्ये पाकिस्तानला ग्रे लिस्टमध्ये टाकले होते. दहशतवादी वित्तपुरवठा रोखण्यासाठी उपाययोजना केल्यानंतर २०२२ मध्ये पाकिस्तानला या यादीतून वगळण्यात आले. काँग्रेस रिसर्च सर्व्हिस ही अमेरिकी काँग्रेसची स्वतंत्र संशोधन संस्था असून तिचे अहवाल हे अमेरिकी काँग्रेसची अधिकृत भूमिका दर्शवत नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## अमित शाहांवरच आरोपपत्र दाखल करावे : ममता बॅनर्जी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुरुलिया :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तृणमूल काँग्रेस सरकारविरोधात राजकीय 'आरोपपत्र' प्रसिद्ध केल्यानंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी जोरदार पलटवार केला. त्यांच्या पूर्वीच्या कृत्यांसाठी अमित शाह यांच्यावरच आरोपपत्र दाखल केले पाहिजे, असे ममता बॅनर्जी यांनी रविवारी म्हटले.

पुरुलिया येथील निवडणूक सभेला संबोधित करताना त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी भाजपवर अनेक आरोप केले. राज्यात भाजप सत्तेवर आल्यास महिलांसाठीची 'लक्ष्मीर भांडार' योजना बंद केली जाईल, असा दावा त्यांनी केला. तसेच भाजप सरकार आल्यास लोकांच्या आहाराच्या आवडीनिवडींवर निर्बंध लादले जातील, असा आरोपही त्यांनी केला. "भाजप सत्तेवर आला तर लोकांना मासे, मांस आणि अंडी खायला मिळणार नाहीत. ते 'लक्ष्मीर भांडार' योजना बंद करतील," असे ममता बॅनर्जी म्हणाल्या.

याशिवाय त्यांनी विधानसभा निवडणुकांपूर्वी एसआयआर प्रक्रियेच्या माध्यमातून सुमारे १.२ कोटी मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आल्याचा गंभीर आरोपही केला. या आरोपांमुळे पश्चिम बंगालच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांचे वातावरण अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## टीएमसी कार्यालयात कॅरम खेळणे भोवले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सिलिगुडी :** सिलिगुडी येथील तृणमूल काँग्रेसच्या कार्यालयात कॅरम खेळतानाचा कथित व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर निवडणूक आयोगाने केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या तीन जवानांना निलंबित केले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या प्रकरणी विभागीय चौकशीचे आदेशही देण्यात आले आहेत.

व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये तृणमूल काँग्रेसच्या सिलिगुडी कार्यालयात केंद्रीय दलाचा एक जवान तीन स्थानिक तरुणांसोबत कॅरम खेळताना दिसत असून दुसरा जवान उभा आणि तिसरा खुर्चीवर बसलेला दिसत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र या व्हिडिओची स्वतंत्र पडताळणी झालेली नसल्याचे वृत्तात म्हटले आहे. सिलिगुडी विधानसभा मतदारसंघातील भाजप उमेदवार शंकर घोष यांनी या घटनेचा निषेध करत ही घटना अत्यंत निंदनीय असल्याचे म्हटले आहे. केंद्रीय दले कशी आणि कुठे तैनात केली जात आहेत, हे अस्पष्ट असून या प्रकरणात स्थानिक प्रशासन किंवा पोलिसांचा सहभाग असेल तर त्यांच्यावरही कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष संजय अधिकारी यांनीही चिंता व्यक्त करत कॅरम खेळणे गुन्हा नसला तरी राजकीय पक्षाच्या कार्यालयात केंद्रीय दलाच्या जवानांनी असे करणे अनुचित असल्याचे म्हटले.

दरम्यान, या वादावर प्रतिक्रिया देताना तृणमूल काँग्रेस चे जिल्हा सहउपाध्यक्ष मलय मुखर्जी यांनी संबंधित जवान टीएमसी कार्यालयात कामानिमित्त आले होते आणि तेथे अनौपचारिक संवाद साधताना कॅरम खेळत होते, असे स्पष्टीकरण दिले. या प्रकरणामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## केदारनाथ मार्गावरील बर्फ हटवण्यासाठी मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रुद्रप्रयाग :** चारधाम यात्रा जवळ येत असल्याने केदारनाथ धामच्या मार्गावरील दाट बर्फ हटवण्यासाठी रुद्रप्रयाग जिल्हा प्रशासनाने युद्धपातळीवर मोहीम सुरू केली आहे. यात्रा २२ एप्रिलपासून सुरू होणार असल्याने यात्रेकरूंसाठी पादचारी मार्ग सुरक्षित करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे.

रुद्रप्रयाग जिल्ह्यातील केदारनाथ मंदिर मार्गावर हिवाळ्यानंतर मोठ्या प्रमाणात बर्फ साचला असून तो हटवण्याचे काम सुरू आहे. उत्तराखंड पर्यटन यात्रा विभाग यांच्या माहितीनुसार चारधाम यात्रेची अधिकृत सुरुवात १९ एप्रिल रोजी यमुनोत्री मंदिर आणि गंगोत्री मंदिर उघडण्याने होईल. त्यानंतर २२ एप्रिल रोजी केदारनाथ मंदिर उघडणार असून २३ किंवा २४ एप्रिल रोजी बद्रीनाथ मंदिर उघडले जाणार आहे. गेल्या वर्षी चारधाम यात्रेला सुमारे १७.७ लाख भाविकांनी भेट दिली होती. यावर्षीही मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता असल्याने प्रशासन तयारीला लागले आहे. मात्र, ट्रेकिंग मार्गावर मोठ्या प्रमाणात बर्फ साचल्याने काम आव्हानात्मक झाले आहे.



जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (डीडीएमए) च्या अहवालानुसार भैरव आणि कुबेर हिमनदी परिसरात १५ ते १८ फूट बर्फ साचला आहे. त्यामुळे मार्ग मोकळा करण्यासाठी विशेष पथके काम करत आहेत. जिल्हाधिकारी विशाल मिश्रा यांनी ६० जणांचे दोन पथकांमध्ये विभाजन करण्याचे आदेश दिले आहेत. एक पथक केदारनाथ मंदिराकडून खाली येत मार्ग साफ करत आहे, तर दुसरे पथक लिंचोलीकडून वरच्या दिशेने काम करत आहे. मार्गातील सहा प्रमुख हिमनदी भाग साफ करणे हे सध्या मुख्य उद्दिष्ट आहे. प्रशासनाने मोहिमेच्या कामावर सतत लक्ष ठेवले असून गरज पडल्यास अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्याची तयारी दर्शवली आहे. यात्रेकरूंना सुरक्षित आणि सुरळीत सुविधा देणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## अमेरिका इराणमध्ये कारवाईच्या तयारीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव अधिक तीव्र होत असून अमेरिका इराणमध्ये मर्यादित स्वरूपाच्या जमिनीवरील लष्करी कारवायांची तयारी करत असल्याची माहिती समोर आली आहे. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनी परिसर आणि खार्ग बेट या रणनीतिक भागांवर अमेरिकेचे लक्ष केंद्रित असल्याचे वृत्त आहे.

अमेरिकेचे संरक्षण विभाग काही आठवडे चालणाऱ्या मर्यादित ग्राउंड ऑपरेशन्सची योजना तयार करत असल्याचे वृत्त आंतरराष्ट्रीय माध्यमांनी दिले आहे. या कारवायांमध्ये किनारी भागांवर छापे, लष्करी तळांवर कारवाई आणि समुद्री मार्ग सुरक्षित करण्यावर भर असू शकतो. मात्र हे पूर्ण स्वरूपाचे युद्ध किंवा मोठे आक्रमण नसून मर्यादित लष्करी मोहिमा असतील, असे अमेरिकन अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. खार्ग बेट हे इराणसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. इराणच्या तेल निर्यातीचा मोठा हिस्सा या बेटावरून होतो. त्यामुळे या बेटावर दबाव निर्माण झाला तर इराणच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या बेटाला मोठे सामरिक महत्त्व आहे.

दरम्यान, होर्मुझ सामुद्रधुनी हा जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल वाहतूक मार्गांपैकी एक मानला जातो. जगातील मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल या मार्गाने वाहतूक केले जाते. या सामुद्रधुनीत तणाव वाढल्यास जागतिक तेल बाजार, व्यापार आणि अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो.

तज्ज्ञांच्या मते, जर अमेरिकेने इराणच्या भूभागावर किंवा खार्ग बेटावर प्रत्यक्ष जमिनीवरील कारवाई केली, तर संघर्ष आणखी भडकण्याची शक्यता आहे. इराणकडून ड्रोन, क्षेपणास्त्रे आणि समुद्री माईन्सऱ्या माध्यमातून प्रतिहल्ले होऊ शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

## राजनैतिक प्रयत्न सुरू असताना हल्ल्याची तयारी

## अमेरिकेवर इराणचा गंभीर आरोप



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** इराणचे संसद अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी अमेरिका युद्ध संपवण्यासाठी राजनैतिक प्रयत्न करत असल्याचे सांगत असली तरी गुप्तपणे जमिनीवरील हल्ल्याची योजना आखत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या निवेदनात त्यांनी हा दावा केला.

गालिबाफ म्हणाले की, शत्रू एकीकडे वाटाघाटी आणि संवादाचे संदेश देत असताना दुसरीकडे गुप्तपणे जमिनीवरील हल्ल्याची तयारी करत आहे. इराणचे सैनिक अमेरिकन सैन्याच्या आगमनाची वाट पाहत असून त्यांना कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

२८ फेब्रुवारी रोजी इस्रायल आणि अमेरिका यांनी इराणवर हवाई हल्ले केल्याने मध्य पूर्वेतील संघर्ष तीव्र झाला. या हल्ल्यात इराणच्या सर्वोच्च नेत्याचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला होता. या घटनेनंतर मध्य पूर्वेतील परिस्थिती अधिक तणावपूर्ण बनली आहे. दरम्यान, जगातील सुमारे २० टक्के कच्चे तेल आणि द्रवरूप नैसर्गिक वायू वाहतूक होणाऱ्या होर्मुझ सामुद्रधुनी मधील सागरी वाहतूकही या संघर्षामुळे मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली असून काही प्रमाणात ठप्प झाली आहे. गालिबाफ यांनी इराणी नागरिकांना एकतेचे आवाहन करत देश सध्या मोठ्या जागतिक संघर्षात गुंतला असून परिस्थिती अत्यंत गंभीर टप्प्यावर असल्याचे सांगितले. इराणवर हल्ला केल्याबद्दल अमेरिकेला त्याची किंमत मोजावी लागेल आणि इराण आपले हक्क ठामपणे सुरक्षित करेल, असेही त्यांनी म्हटले.

## भारताच्या वैद्यकीय पर्यटनावर मोठा परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील सुरू असलेल्या युद्धाचा भारतातील वेगाने वाढणाऱ्या वैद्यकीय पर्यटन क्षेत्रावर मोठा परिणाम झाला असून परदेशी रुग्णांच्या संख्येत ३० ते ४० टक्क्यांची घट झाल्याची माहिती उद्योग अहवालातून समोर आली आहे. यामुळे वैद्यकीय पर्यटनशी संबंधित महसुलातही मोठी घट झाली आहे.

उद्योग अहवालानुसार, राष्ट्रीय राजधानी क्षेत्र, महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक आणि तेलंगणा यांसारख्या प्रमुख वैद्यकीय केंद्रांमध्ये आंतरराष्ट्रीय रुग्णांच्या भेटींमध्ये मोठी घट झाली आहे. गेल्या दोन आठवड्यांत काही रुग्णालयांमध्ये परदेशी रुग्णांची संख्या ५० ते ७५ टक्क्यांनी घटल्याचेही समोर आले आहे. उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, परदेशी रुग्ण कमी झाल्यामुळे संपूर्ण वैद्यकीय पर्यटन क्षेत्राच्या मासिक महसुलात १५ ते २० टक्क्यांची घट झाली आहे, तर काही रुग्णालयांमध्ये महसुलात ३५ टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. दिल्लीतील काही रुग्णालयांमध्ये वैद्यकीय पर्यटनाशी संबंधित महसुलात ३० ते ४० टक्क्यांची घट नोंदवली गेली आहे.

सध्या परिस्थिती अनिश्चित असल्याने अनेक रुग्णालय साखळ्या आता नवीन बाजारपेठांकडे वळत आहेत. यामध्ये दक्षिण व आग्नेय आशिया, आफ्रिका आणि मध्य आशिया या प्रदेशांचा समावेश आहे. विशेषतः इंडोनेशिया, श्रीलंका, नायजेरिया, केनिया आणि मॉरिशस या देशांमधून रुग्ण आणण्यावर भर दिला जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, विमान उड्डाणे रद्द होणे, व्हिसा प्रक्रियेत विलंब आणि विमान भाड्यात १५ ते २५ टक्क्यांनी वाढ यामुळे पश्चिम आशियातील रुग्णांना भारतात उपचारासाठी येणे कठीण झाले आहे. प्लास्टिक सर्जरी, वृद्धावस्था चिकित्सा, अस्थिरोग आणि प्रजनन उपचार यांसारख्या ऐच्छिक उपचारांवर याचा सर्वाधिक परिणाम झाला आहे.

या संघर्षामुळे नियमित तपासणीसाठी भारतात येणाऱ्या रुग्णांच्या भेटींवरही परिणाम झाला आहे. कार्डिओलॉजी, ऑन्कोलॉजी, ट्रान्सप्लांट आणि ऑर्थोपेडिक्स उपचारांसाठी दर काही महिन्यांनी भारतात येणारे रुग्ण सध्या प्रवासातील अनिश्चिततेमुळे येऊ शकत नाहीत.

## अपघाती गोळीबारात तीन जवान जखमी

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरच्या कुपवारा जिल्ह्यात झालेल्या कथित अपघाती गोळीबारात तीन जवान जखमी झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी येथे दिली. एका लष्करी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री त्रेहगाम भागातील लष्करी छावणीत एका जवानाच्या सर्व्हिस वेपनमधून चुकून गोळी सुटल्याने ही घटना घडली, ज्यामध्ये त्याचे तीन सहकारी जखमी झाले. या घटनेत तीन सैनिक जखमी झाले असून त्यांच्यावर लष्करी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## हिमाचल काँग्रेसला समिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड :** जवळपास दीड वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखिल भारतीय काँग्रेस समितीने हिमाचल प्रदेश काँग्रेस समिती ची नवी कार्यकारी समिती जाहीर केली आहे. या समितीत १२ उपाध्यक्ष आणि २७ सरचिटणीसांची नियुक्ती करण्यात आली. काँग्रेसचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी ही घोषणा करताना सांगितले की, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी कार्यकारी समिती, शिस्तपालन समिती आणि इतर महत्त्वाच्या नियुक्त्यांना मंजुरी दिली आहे.

२१ सदस्यीय कार्यकारी समितीत मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू, उपमुख्यमंत्री मुकेश अग्निहोत्री, माजी केंद्रीय मंत्री आनंद शर्मा, माजी प्रदेशाध्यक्ष प्रतिभा सिंग यांसह आशा कुमारी, धनीराम शांडिल, विप्लव ठाकूर, कौल सिंग ठाकूर, चंदर कुमार आणि कुलदीप सिंग राठोड यांचा समावेश आहे. तसेच मंत्री हर्षवर्धन चौहान, जगत सिंग नेगी, रोहित ठाकूर, अनिरुद्ध सिंग आणि विक्रम आदित्य सिंग यांचाही समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील सर्व काँग्रेस आमदार, पक्ष पदाधिकारी, आघाडी संघटनांचे प्रमुख तसेच अनुसूचित जाती, ओबीसी आणि आदिवासी विभागांचे अध्यक्ष हे पदसिद्ध सदस्य म्हणून कार्यकारी समितीत काम पाहणार आहेत. नवीन उपाध्यक्षांमध्ये प्रकाश चौधरी, नीरज भारती, बंबर ठाकूर, सतपाल रायजादा, रजनीश किमटा, पारस राम, मोहिंदर चौहान, जीवन ठाकूर, करण सिंह पठानिया, अमित नंदा आणि चेत राम ठाकूर यांचा समावेश आहे.

## २०३६ नंतर जीडीपी वाढीवर परिणाम होण्याची शक्यता

# भारतात वृद्धत्वाचे वाढते प्रमाण चिंताजनक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** भारतात लोकसंख्या संरचनेत मोठा बदल होत असून देशात वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. या लोकसंख्यात्मक बदलाचा भविष्यात अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा इशारा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) च्या अहवालात देण्यात आला आहे.

आरबीआयने 'स्टेट फायनान्सेस : अ स्टडी ऑफ बजेट्स' या अहवालातून राज्यांच्या आर्थिक स्थितीबरोबरच देशातील लोकसंख्यात्मक बदलांचा अभ्यास केला आहे. या अहवालानुसार भारतातील विविध राज्ये लोकसांख्यिकीय संक्रमणाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आहेत. काही राज्यांमध्ये तरुण लोकसंख्या जास्त आहे, तर काही राज्यांमध्ये वृद्ध लोकसंख्या वेगाने वाढत आहे.

अहवालानुसार सध्या देशातील कामकाजाच्या वयोगटातील लोकसंख्या ऐतिहासिक उच्चांकावर असून २०३६ पर्यंत ही स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. मात्र त्यानंतर वृद्ध लोकसंख्या वाढत जाईल आणि कामगारांची संख्या तुलनेने कमी होईल, त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग कमी होऊ शकतो, असे नमूद करण्यात आले आहे. देशाचा प्रजनन दर (फर्टिलिटी रेट) लोकसंख्या स्थिर ठेवण्याच्या पातळीच्या जवळ पोहोचला असून आयुर्मान वाढत असल्यामुळे भविष्यात लोकसंख्या वृद्ध होण्याचा वेग वाढणार आहे. यामुळे कर आकारणीचा आधार कमी होणे, पेन्शन आणि सामाजिक खर्च वाढणे, तसेच सरकारवर आर्थिक दबाव वाढणे अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, तरुण लोकसंख्या जास्त असलेल्या राज्यांनी शिक्षण, कौशल्य विकास आणि आरोग्य क्षेत्रात गुंतवणूक करून लोकसंख्यात्मक लाभ (डेमोग्राफिक डिव्हिडंड) मिळवावा. तर ज्या राज्यांमध्ये वृद्ध लोकसंख्या वाढत आहे, त्यांनी आरोग्य सेवा, निवृत्ती वेतन आणि रोजगार धोरणात बदल करण्याची गरज आहे.

तज्ज्ञांच्या मते, भारत सध्या तरुण देश असला तरी पुढील काही दशकांत देश वृद्ध लोकसंख्या असलेल्या देशांच्या दिशेने जाईल. त्यामुळे अर्थव्यवस्था, रोजगार, आरोग्य व्यवस्था आणि सामाजिक सुरक्षा यामध्ये मोठे धोरणात्मक बदल करावे लागणार आहेत.